मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 6 जून 2025 | पान- 1

# शून्य कचरा प्रकल्पाचे आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन

## महिला बचत गटामार्फत चालवला जातोय प्रकल्प : घरगुती कचऱ्यापासून खत निर्मिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्पाचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते आज उद्घाटन करण्यात आले. महिला बचत गटामार्फत चालवल्या जाणाऱ्या या प्रकल्पात घरगुती कचऱ्यापासून खत निर्मिती करण्यात येते.

महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत दापोडी येथे शून्य कचरा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन आयुक्त सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपायुक्त सचिन पवार, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, सीवायडीए सामाजिक संस्थेचे संस्थापक मॅथ्यू मॅथम, कार्यकारी संचालक प्रवीण जाधव, अकर सोल्युशन्सचे उपाध्यक्ष दिलीप गाडा आदी उपस्थित होते.

आयुक्त सिंह यांनी यावेळी प्रकल्पातील विविध उपक्रमांचा आढावा घेतला. घनकचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कशा पद्धतीने करण्यात येत आहे, याबाबत माहिती घेतली. प्रकल्पस्थळी कार्यरत बचतगटांच्या महिलांशी संवाद साधून त्यांच्या कामाची प्रशंसा केली. यावेळी ते म्हणाले, दापोडी परिसरात सुरु असलेला शून्य कचरा प्रकल्प हा पर्यावरणपूरक आणि शाश्वत नागरी स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. घरगुती कचऱ्याचे संकलन केल्यानंतर तो वर्गीकृत करून त्याद्वारे खत निर्मिती करण्याची प्रक्रिया करण्याचे काम करणाऱ्या महिलांची आरोग्याची काळजी येथे व्यवस्थित घेतली जात आहे. या महिलांना आरोग्याच्या दृष्टिने आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, असेही आयुक्त सिंह म्हणाले.



शून्य कचरा प्रकल्पामध्ये स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढवण्यावरही भर देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही आयुक्त सिंह यांनी यावेळी दिले. उपायुक्त सचिन पवार यांनी आयुक्त सिंह यांना शून्य कचरा प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती दिली.

### असा आहे प्रकल्प

» पिंपरी चिंचवड महापालिकेने सीवायडीए संस्था आणि अकर सोल्युशन यांच्या सहकार्याने दापोडी येथील आनंदवन व काटेवस्ती येथे शून्य कचरा प्रकल्प सुरू केला आहे. वैष्णवी महिला बचत गटाच्या माध्यमातून हा प्रकल्प चालवला जातो. या प्रकल्पांसाठी दररोज ४२८ घरातील कचऱ्याचे संकलन करून त्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करण्यात येते. त्यानंतर धूळ झटकण्याची मशीन, ॲग्लोमीटर मशीन, हायड्रॉलिक प्रेस मशीन, सेमी ऑटोमॅटिक खत मशीन आदीच्या मदतीने कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याद्वारे खत निर्मिती करण्यात येते.

“ दापोडी परिसरात सुरु असलेला शून्य कचरा प्रकल्प हा पर्यावरणपूरक आणि शाश्वत नागरी स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. स्वच्छ, सुंदर पिंपरी चिंचवड शहरासाठी येत्या काळात असे विविध प्रकल्प राबवण्याचे नियोजन आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.**




# वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या ट्रान्सफॉर्मरचे स्थलांतर!

## चिखली- पाटीलनगर रस्ता विना अडथळा; नागरिकांना दिलासा

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहू-आळंदी रस्त्यावर चिखली-पाटील नगर येथील अत्यंत रहदारीच्या ठिकाणी महावितरण प्रशासनाचा जुना ट्रान्सफॉर्मर होता. त्यामुळे रस्त्यात अडथळा निर्माण होवून वाहतूक कोंडीची समस्या नियमित भेडसावत होती. याची दखल घेत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महावितरणकडे ट्रान्सफॉर्मर स्थलांतरित करण्याची सूचना केली होती. या सूचनेनुसार, प्रशासनाने आज ट्रान्सफॉर्मर स्थलांतरीत करण्याची कार्यवाही केली.

भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली- पाटीलनगर येथे देहू- आळंदी रस्त्यावर वाहतुकीला अडथळा ठरणारा महावितरण प्रशासनाचा ट्रान्सफॉर्मर हटवण्याबाबत स्थानिक नागरिक, ग्रामस्थ यांनी मागणी केली होती.

दरम्यान, आमदार महेश लांडगे



यांनी महावितरण प्रशासनाकडे पाठपुरावा केला. अखेर पाटील नगर येथील ट्रांसफार्मर स्थलांतरित केला आहे. यावेळी माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विनायक मोरे यांच्यासह महापालिका व महावितरणचे संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

देहू आळंदी रस्त्यावरील पाटीलनगर हा भाग अतिशय रहदारीचा आहे. या भागातच अनेक लघुउद्योग आहेत कामगारांची सातत्याने या रस्त्यावरून ये जा असते. पाटील नगरच्या ट्रांसफार्मरमुळे देहू आळंदी रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता यामुळे वाहतूक कोंडीची समस्या सातत्याने निर्माण होत होती. हा रस्ता विना अडथळा वाहतुकीसाठी उपलब्ध व्हावा नागरिकांची गैरसोयी दूर व्हावी यासाठी आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने महावितरण कडे पाठपुरावा केला ट्रान्सफॉर्मर स्थलांतरित करण्याबाबत सूचना करत ट्रान्सफॉर्मर स्थलांतरित करण्याची मागणी पूर्ण केली आहे.

# पुणे महापालिकेत तब्बल 7,336 पदे रिक्त

## महापालिकेत दोन वर्षांपूर्वी 2023 मध्ये शेवटची भरती : प्रसाद काटकर यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेत सध्या विविध विभागांतील तब्बल ७ हजार ३३६ पदे रिक्त आहेत. गेल्या काही वर्षांत महापालिकेतून सेवानिवृत्त होणाऱ्यांची संख्या वाढत असून, त्या तुलनेत महापालिकेत नोकरभरती कमी असल्याने प्रत्येक महिन्यात रिक्त पदांची संख्या वाढत आहे. महापालिकेच्या हद्दीत नव्याने ३२ गावांचा समावेश करण्यात आल्यानंतर राज्यातील सर्वाधिक क्षेत्रफळ असलेली महापालिका म्हणून पुणे महापालिकेचा क्रमांक लागतो.

पुणे महापालिकेत वर्ग १ ते वर्ग ४ यांची १६ हजार ३६९ इतकी पदे आहेत. त्यापैकी सध्या ९ हजार ३३ पदे भरण्यात आली असून, ७ हजार ३३६ पदे रिक्त आहेत. यामध्ये सर्वाधिक रिक्त पदे वर्ग तीन आणि वर्ग चारची असल्याची माहिती महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने कमी कर्मचाऱ्यांमध्ये महापालिकेचा कारभार चालविण्याचे आव्हान प्रशासनापुढे आहे.




महापालिकेत दोन वर्षांपूर्वी २०२३ मध्ये शेवटची भरती करण्यात आली. त्यानंतर महापालिकेने भरती प्रकिया राबवलेली नाही. महापालिकेने अभियंता पदासाठी गेल्या वर्षी अर्ज मागवले होते. आरक्षणाच्या कारणांमुळे ही प्रक्रिया स्थगित करण्यात आली. लवकरच ही प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर यांनी दिली.

> “ महापालिकेत कनिष्ठ अभियंता भरतीसाठीचे प्रस्ताव महापालिका आयुक्तांकडे सादर करण्यात आले आहेत. आयुक्तांच्या मंजुरीनंतर पुढील कार्यवाही केली जाईल.
>
> **- प्रसाद काटकर, उपायुक्त, सामान्य प्रशासन, पुणे महापालिका.**



### वारसांना नोकरी

» महापालिकेत सेवेला असणाऱ्या आणि ज्यांना घाण भत्ता लागू आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांना महापालिकेच्या सेवेत घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर या संदर्भातील खटला सुरू होता. न्यायालयाने याबाबत निर्णय दिला असून, ज्या कर्मचाऱ्यांना महापालिकेचा घाण भत्ता लागू आहे, अशा सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वारसांना महापालिकेने सेवेत घ्यावे, असा आदेश न्यायालयाने दिला आहे. यासाठी महापालिकेकडे ३०० कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव दाखल झाले आहेत. त्याची तपासणी सुरू करण्यात आल्याचे प्रसाद काटकर यांनी सांगितले.

# फलकांसाठी बेकायदा वीजजोडणी घेणाऱ्यांना ‘शॉक’

## बेकायदा फलक आढळल्यास संबंधित व्यक्ती, संस्थांवर दंडात्मक कारवाई होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या विद्युत विभागाने शहरातील अनधिकृत फलक आणि त्यांच्या विद्युत जोडणीची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. बेकायदा फलक आढळल्यास संबंधित व्यक्ती, संस्थांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. महापालिकेच्या विद्युत विभागाच्या प्रमुख मनीषा शेकटकर यांनी ही माहिती दिली. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांना याबाबत सूचना देण्यात आल्या असून, पुढील दोन दिवसांत याची माहिती गोळा होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

नाना पेठ येथील इनामदार चौकामधील राजकीय पक्षाशी संबंधित एका फलकाला स्पर्श झाल्याने शाळकरी मुलीला जीव गमवावा लागला. या फलकासाठी महापालिकेच्या विजेच्या खांबावरून बेकायदा विद्युत जोडणी घेण्यात आल्याचे उघडकीस आले होते. सर्वच स्तरांतून टीका होऊ लागल्याने महापालिकेने जबाबदारी घेऊन बेकायदा उभारण्यात आलेले जाहिरात फलक आणि त्यासाठी घेण्यात आलेली वीजजोडणी याची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

ज्या फलकांवर बेकायदा वीजजोडणी घेण्यात आली आहे, त्याची तपासणी करून बेकायदा फलक आणि परवानगी न घेता वीजजोडणी घेतल्याचे लक्षात येताच त्यावर कारवाई करून वीजजोडणी तोडून टाकण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शहरातील विविध भागांत राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बेकायदा फलक उभारले आहेत. तसेच अनेक सार्वजनिक मंडळे, संस्था, संघटनांनी अनधिकृत फलक उभारून विद्युत जोडणी घेतली आहे. संबंधितांची माहिती तपासणी मोहिमेमुळे संकलित होणार आहे.



> “ शहरातील बेकायदा जाहिरात फलक आणि त्यांना देण्यात आलेली वीजजोडणी याची तपासणी करण्यात येणार आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर ही माहिती संकलित करण्यात येणार असून, बेकायदा वीजजोडणी आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील दोन दिवसांत तपासणी पूर्ण केली जाणार आहे.
>
> **- मनीषा शेकटकर, विद्युत विभाग प्रमुख, पुणे महापालिका.**

# पिंपरी चिंचवड ठरली राज्यातील पहिली महापालिका

## हरित कर्ज रोखे (ग्रीन बॉण्ड) इश्यू करून २०० कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभारला

**पिंपरी | प्रतिनिधी**

हरित कर्ज रोखे (ग्रीन बॉण्ड) इश्यू करून २०० कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभी करणारी पिंपरी चिंचवड महापालिका कामगिरी करणारी महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली आहे.

हरित कर्ज रोखे (ग्रीन बॉण्ड) इश्यू करून २०० कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभी करणारी पिंपरी चिंचवड महापालिका कामगिरी करणारी महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली आहे. महापालिकेने हे रोखे बीएसईच्या इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणालीवर खासगी गुंतवणुकीच्या माध्यमातून इश्यू केले. या इश्यूला गुंतवणूकदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

उभारलेला निधी निगडी प्राधिकरणातील हरित सेतू प्रकल्प आणि गवळी मठ ते इंद्रायणी नगर चौक दरम्यानचा टेल्को रस्ता विकास प्रकल्प या दोन महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे. हे दोन्ही प्रकल्प महापालिकेच्या शाश्वत व हवामानानुकूल शहरी विकास दृष्टिकोनाचा भाग आहेत.

गुंतवणूकदारांचा पीसीएमसीवर असलेला विश्वास अधोरेखित करत, इश्यू सुरु होताच केवळ एका मिनिटात १०० कोटी रुपयांचा मूळ भाग भरला गेला, तर एकूण ५१३ कोटी रुपयांच्या निविदा प्राप्त झाल्या, म्हणजेच रोख्याला ५.१३ पट अधिक मागणी मिळाली.

ए. के. कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड यांनी या इश्यूसाठी व्यवहार सल्लागार आणि मर्चंट बँकर म्हणून काम पाहिले. या रोख्यांचा कालावधी पाच वर्षांचा असून, त्यासाठी ७.८५ टक्के स्पर्धात्मक व्याजदर निश्चित करण्यात आला आहे. परतफेडीची हमी सुनिश्चित करण्यासाठी मालमत्ता करातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे राष्ट्रीयकृत बँकेत एस्क्रो खाते तयार करण्यात आले आहे. या यशस्वी इश्यूमुळे पीसीएमसीला भारत सरकारकडून २० कोटी रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देखील मिळणार आहे. हरित कर्ज रोख्यांतून २०० कोटीचा निधी उभी करणारी पिंपरी चिंचवड महापालिका कामगिरी करणारी महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली आहे.




### या प्रकल्पांसाठी वापरला जाणार निधी

» हरित कर्ज रोख्यांतून उभारलेला निधी निगडी प्राधिकरणातील हरित सेतू प्रकल्प आणि गवळी मठ ते इंद्रायणी नगर चौक दरम्यानचा टेल्को रस्ता विकास प्रकल्प या दोन महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे. हे दोन्ही प्रकल्प महापालिकेच्या शाश्वत व हवामानानुकूल शहरी विकास दृष्टिकोनाचा भाग आहेत.

### 'एए प्लस' पतमानांकन

» या हरित कर्ज रोखा इश्यूला क्रिसिल आणि केअर या मान्यताप्राप्त पतमापन संस्थांकडून 'एए+' (AA+) दर्जा मिळाला आहे. ए. के. कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड यांनी या इश्यूसाठी व्यवहार सल्लागार आणि मर्चंट बँकर म्हणून काम पाहिले. या रोख्यांचा कालावधी पाच वर्षांचा असून, त्यासाठी ७.८५ टक्के स्पर्धात्मक व्याजदर निश्चित करण्यात आला आहे. परतफेडीची हमी सुनिश्चित करण्यासाठी मालमत्ता करातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे राष्ट्रीयकृत बँकेत एस्क्रो खाते तयार करण्यात आले आहे.या यशस्वी इश्यूमुळे पीसीएमसीला भारत सरकारकडून २० कोटी रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देखील मिळणार आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेने हरित कर्ज रोखे इश्यू करताच त्याला मिळालेला उदंड प्रतिसाद पाहता, पिंपरी चिंचवडच्या शाश्वत भविष्याबद्दल गुंतवणूकदारांचा महापालिकेवर विश्वास असल्याचे स्पष्ट होते. या निधीमुळे शहरात महत्त्वाचे पर्यावरणपूरक प्रकल्प गतीने राबवणे शक्य होणार आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

# विनापरवानगी २० झाडे तोडणाऱ्यांना साडेनऊ लाखाचा दंड

## दिघी येथील स्वराज कॉलनीतील काशी मठ संस्थान जागेवरील झाडांच्या फाद्यांची छाटणी करुन २० झाडे मुळासकट काढण्यात आली आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिघी येथील स्वराज कॉलनीतील काशी मठ संस्थान जागेवरील झाडांच्या फाद्यांची छाटणी करुन २० झाडे मुळासकट काढण्यात आली. याबाबत महानगरपालिका उद्यान विभागाने प्रत्यक्ष जागेचा पंचनामा करुन संबंधित जागा मालकाला नोटीस पाठविली आहे. तसेच प्रति झाडाला ५० हजार आणि फांद्या छाटणीचे १० हजार रुपये अशी नऊ लाख ६० हजार दंडात्मक कारवाई केली आहे.

दिघी येथील स.नं. ७८ / ४ / १ / ५३ मधील क्षेत्र ५ आर श्री काशीमठ संस्थान यांच्या मालकी हक्काची जागा आहे. या जागेवर सदरील जागा मालकांकडून विविध प्रजातीची वृक्षाची लागवड केली होती. या जागेवर नारळ, सुपारी, तुती, साग, आवळा, बदाम, अंबाडी, काजू, अशा विविध प्रकारची वृक्ष लावलेली होती. साधारणपणे सदरचे वृक्षाची उंची हे चार ते पाच फूटांची उंची होती. ही झाडे जेसीबीच्या सहाय्याने जागा मालकाकडून काढण्यात आलेली आहेत.

या जागेवरील वृक्ष तोड करताना महापालिकेच्या उद्यान विभागाकडून कोणतीही परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे जेसीबी सहाय्याने मुळासकट झाडे काढण्यात आली. काही झाडांच्या फांद्या देखील छाटण्यात आलेल्या आहेत. याबाबत विनापरवाना वृक्षतोड केल्याने कृष्णा प्रभू यांनी महापालिकेच्या उद्यान विभागाकडे तक्रार केली आहे. त्यानूसार महापालिकेकडून उद्यान सहायक आणि सहायक उद्यान अधिक्षक २४ डिसेंबर २०२४ रोजी जागेवर २० झाडाचा पंचनामा केला आहे. घटनास्थळी जागेवर जाऊन पाहणी अहवाल तयार करुन तो अहवाल सादर करण्यात आला.

पंचनाम्यानूसार वृक्ष प्राधिकरण ठराव क्रमाक १४ नूसार दंडात्मक कारवाई करण्यास मोहनदास मल्या यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. संबंधित जागा मालकाने विनापरवानगी झाडांच्या फाद्यांची छाटणी केली. त्यानंतर झाडे ही मुळासकट काढण्यात आली आहेत.



### झाडे तोडणाऱ्यांना साडेनऊ लाखाचा दंड

» पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाने विनापरवानगी वृक्ष काढल्याने महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील कलम २१ मधील तरतूदीचे उल्लंघन केल्याने एका वृक्षास ५० हजार आणि फाद्या तोडल्याचे १० हजार रुपये प्रमाणे २० झाडांचे एकूण ९ लाख ६० हजार रुपये दंड आकारण्यात आला आहे.

> "दिघी येथील काशिमठ संस्थान या जागेवरील झाडे ही विनापरवानगी तोडल्याचे तक्रार प्राप्त झाली होती. त्यानूसार प्रत्यक्षात जागेवर जाऊन शहानिशा करून पंचनामा केला आहे. संबंधिताना नोटीस बजावून देखील खूलासा केला नाही. त्यानंतर प्रति झाड ५० हजार रुपये प्रमाणे नऊ लाख ६० हजार रुपये दंडात्मक कारवाई केलेली आहे. दंडात्मक रक्कम न भरल्यास पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल."
>
> **- उमेश ढाकणे, सहायक आयुक्त, उद्यान विभाग, महानगरपालिका.**

# विमानतळ नकोच! शेतकऱ्यांचे राष्ट्रपतींना साकडे

## सासवडच्या प्रकल्पबाधित पारगाव मेमाणे गावामधील शेतकऱ्यांचे द्रौपदी मुर्मू यांना पत्र

**पुणे | प्रतिनिधी**

प्रस्तावित पुरंदर विमानतळ प्रकल्प करण्याची प्रशासनाने जोरदार तयारी केली असून, त्याबाबत प्रकल्पबाधित सात गावांमध्ये विरोधाचा व नाराजीचा सूर वाढत चाललेला आहे. विमानतळबाधितांनी आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना विमानतळ नकोच, असे साकडे घातले आहे.

विमानतळबाधित पारगाव मेमाणे गावातील बाधित शेतकरी यांनी पुरंदर विमानतळबाधितांच्या मागण्या मांडणारे पत्र राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पाठविले आहे. असेच पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनाही पाठविले असल्याचे बाधित शेतकऱ्यांनी सांगितले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रामध्ये पुरंदर विमानतळविरोधातील शेतकऱ्यांनी म्हटले आहे की, 'महोदया, आपण भारतीय राज्यघटनेच्या रक्षणकर्त्या असून, देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर विराजमान आहात. त्यामुळेच आम्ही पुरंदर तालुक्यातील सामान्य शेतकरी, महिला, तरुण व नागरिक आमच्या वेदना आणि व्यथा थेट आपल्यासमोर मांडत आहोत.'

'गेल्या 10 वर्षांपासून आम्ही शांततामय आणि घटनात्मक मार्गाने पुरंदर विमानतळ प्रकल्पाचा सातत्याने विरोध करीत आहोत. 5 फेब्रुवारी 2018 रोजी आम्हा शेतकऱ्यांनी तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना इच्छामृत्यूची परवानगी द्या, अशा तीव्र भावना व्यक्त करणारे पत्र पाठवले होते. परंतु, आजपर्यंत त्याला कुठलेही उत्तर मिळालेली नाही.

आजही आम्ही भारतीय नागरिक असूनही आपल्या देशातच आमच्या न्यायासाठी केलेल्या आवाजाकडे दुर्लक्ष केले जात आहे. आमची ही लढाई ही कोणत्याही राजकीय पक्षाविरोधात नाही. आमची ही लढाई आहे ती आमच्या भूमी अधिकारांची, लोकशाहीच्या रक्षणाची आणि भारतीय राज्यघटनेतील वचनांच्या सन्मानाची.

राज्यघटना वाचवा, लोकशाही वाचवा, पुरंदर वाचवा, अशी मागणी करत आपण एक जबाबदार घटनात्मक पालक म्हणून या न्याय युद्धात हस्तक्षेप करावा,' अशी नम्र विनंती करणारे हे पत्र पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळबाधित पारगाव गावचे शेतकरी युवराज मेमाणे यांनी सात बाधित गावांतर्फे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पाठवले आहे. या पत्रावर राष्ट्रपती नेमकी काय भूमिका घेणार याकडे संपूर्ण पुरंदरसह पुणे जिल्हा व राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.



### आता राष्ट्रपतींकडूनच आशा

» पुरंदर विमानतळाला आमचा ठाम विरोध आहे. सातही गावे एकत्रितपणे आंतरराष्ट्रीय विमानतळाला विरोध करीत आहोत. यासंदर्भात साकडे घालण्यासाठी आम्ही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र पाठविले आहे. आम्ही सरकारला वारंवार सांगत आहोत, आम्हाला विमानतळ नको आहे, तरीदेखील आमच्यावर हे विमानतळ लादले जात आहे. आम्हाला आशा आहे की, राष्ट्रपती या प्रश्नाकडे लक्ष देतील व विमानतळ रद्द होईल, असे विमानतळबाधित शेतकऱ्यांनी सांगितले.

### बाधित गावांतील शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

» स्वतः या प्रकरणाकडे लक्ष द्यावे.
» राष्ट्रपती भवनातर्फे एक प्रतिनिधी मंडळ पाठवून स्थळपाहणी केली जावी.
» राज्य सरकारला या प्रकल्पावर पारदर्शक, लोकहितेशी आणि संवादात्मक प्रक्रिया अवलंबण्याचे निर्देश द्यावेत.
» स्थानिक पातळीवर अहवाल, जनसंवाद व पर्यावरणीय सत्याची निष्पक्ष तपासणी व्हावी.
» एकाही शेतकऱ्याचा विरोध असल्यास हा प्रकल्प रद्द करावा.

# खासगी रुग्णालयांमधील आयसीयू 'फुल्ल'; पोर्टलवर बेडची संख्या देण्याची मागणी

## खासगी रुग्णालयांच्या अतिदक्षता विभागात सध्या श्वसनमार्गाचा तीव्र संसर्ग, हृदयविकाराचा झटका, अपघात, ब्रेन स्ट्रोक, अशा स्वरूपाचे रुग्ण असल्याचे तज्ज्ञ डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या रुग्णालयात 'पेड' आयसीयू, ससूनमधील आयसीयूमध्ये 'वेटिंग' आणि खासगी रुग्णालयांमधील आयसीयू 'फुल्ल', अशी स्थिती शहरात पाहायला मिळत आहे. खासगी रुग्णालयांच्या अतिदक्षता विभागात सध्या श्वसनमार्गाचा तीव्र संसर्ग, हृदयविकाराचा झटका, अपघात, ब्रेन स्ट्रोक, अशा स्वरूपाचे रुग्ण असल्याचे तज्ज्ञ डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे.

रुग्णांची ससेहोलपट थांबण्यासाठी कोरोना काळाप्रमाणे शहरातील सर्व खासगी आणि शासकीय रुग्णालयांमधील बेडबाबतची अद्ययावत माहिती पोर्टलवर उपलब्ध व्हावी, अशी मागणी होत आहे.

अनेक रुग्णांना सध्या आयसीयू बेड मिळवण्यासाठी कसरत करावी लागत आहे. शहरातील सुमारे 1000 रुग्णालयांमध्ये केवळ 1200 ते 1500 आयसीयू बेड उपलब्ध आहेत. ससून रुग्णालयावर मोठ्या प्रमाणात ताण असल्याने तेथे आयसीयूसाठी कायम प्रतीक्षा करावी लागते. दुसरीकडे खासगी रुग्णालयांमध्येही 90-100 टक्के खाटा भरलेल्या आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीमध्ये रुग्णांना तातडीचे उपचार मिळावेत, यासाठी नातेवाइकांची धावपळ होत आहे.




सध्या आयसीयू बेडची मागणी खूप वाढली आहे. सध्या कोरोनाचे रुग्ण वाढत असले, तरी त्यांच्यामध्ये सौम्य लक्षणे दिसून येत असल्याने रुग्णालयांमध्ये दाखल करावे लागणाऱ्या आणि आयसीयू बेड लागणाऱ्या रुग्णांचे प्रमाण नगण्य आहे. आजारांची तीव्रता जास्त असलेल्या रुग्णांना आयसीयूची गरज लागू शकते.

> शहरातील मोठ्या रुग्णालयांमधील आयसीयू बेडची मागणी दिवसेंदिवस वाढत आहेत. कोरोना काळात सर्वच रुग्णालयांनी खाटांची संख्या वाढवली होती. प्रौढ, बालके आणि नवजात शिशू अशा विविध अतिदक्षता विभागांतील खाटा 80 ते 90 टक्के खाटा फुल्ल असतात. रुग्णांची प्रकृती लक्षात घेऊन आयसीयूमध्ये दाखल करणे किंवा जनरल वॉर्डमध्ये हलवण्याचा निर्णय घेतला जातो.
>
> **- डॉ. हनमंत साळे, अध्यक्ष, हॉस्पिटल असोसिएशन ऑफ इंडिया**

> सध्या केईएम रुग्णालयात श्वसन संक्रमण, अपघात, हृदयविकार अशा स्वरूपाचे रुग्ण आयसीयूमध्ये दाखल आहेत. साधारणपणे 80-90 टक्के बेड फुल्ल आहेत. रुग्णांच्या आजाराचा प्रकार, गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना किमान एक तर जास्तीत जास्त दोन ते तीन आठवडे आयसीयूमध्ये ठेवावे लागते. रुग्णांना आयसीयूमधील उपचार कधीही नाकारले जात नाहीत.
>
> **- डॉ. प्रदीप डिकोस्टा, केईएम रुग्णालय**